**न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.**

**सं.फौ.खटला क्र. १९४/२०२४**

**नि.क्र.** १४

**दोषारोपपत्र**

**मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की,**

**आरोपीचे नाव –** **स्वप्नील मनोहर शेलार,**
**वय** – ३६ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी,
**राहणार** – सांगवे, रिंगेवाडी,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

दिनांक २०/०६/२०२४ रोजी सायंकाळी २२:१५ वाजताच्या सुमारास तुमच्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच–०८–एपी–१७७८ ही देवरुख ते संगमेश्वर जाणारे रोडवर मौजे साडवली, येथे लेझर पॉईंट बार आणि रेस्टॉरंट समोर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, येथे रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून समोरुन येणारी स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एल–४८१५ हीचकडे दुर्लक्ष करुन बोलेरो गाडी अचानक उजवीकडे वळविल्याने समोरुन येणारी मोटार सायकल ही बोलेरो पिकअप गाडीचे पुढील डावे चाकाजवळ धडक देवुन मोटारसायकल चालक प्रदिप शंकर गुरव यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला, म्हणून तुम्ही **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३०४ (अ) अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, वर नमुद दिवशी,

तुम्ही तुमच्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच–०८–एपी–१७७८ ही रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे मानवी जीवन धोक्यात येईल किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला दुखापत होईल अशा रीतीने चालविली, म्हणून तुम्ही **भारतीय दंड विधान १८६० चे कलम २७९ अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

तिसरे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, वर नमुद दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही तुमच्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच–०८–एपी–१७७८ गाडी वर नमुद ठिकाणी अतीवेगात व हयगयीने रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता चालवून स्वतःचे व इतरांचे जीवीतास धोका निर्माण होईल अशी चालवून समोरुन येणारी स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एल–४८१५ हीचकडे दुर्लक्ष करुन बोलेरो गाडी अचानक उजवीकडे वळविल्याने समोरुन येणारी मोटार सायकल ही बोलेरो पिकअप गाडीचे पुढील डावे चाकाजवळ धडक देवुन मोटारसायकल चालक प्रदिप शंकर गुरव यांच्या किरकोळ दुखापतीस कारणीभुत झालात म्हणून, तुम्ही त्याव्दारे **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३३७ अन्वये**, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

चौथे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, वर नमुद दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही तुमच्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्रमांक एमएच–०८–एपी–१७७८ गाडी वर नमुद ठिकाणी अतीवेगात व हयगयीने रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता चालवून स्वतःचे व इतरांचे जीवीतास धोका निर्माण होईल अशी चालवून समोरुन येणारी स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एल–४८१५ हीचकडे दुर्लक्ष करुन बोलेरो गाडी अचानक उजवीकडे वळविल्याने समोरुन येणारी मोटार सायकल ही बोलेरो पिकअप गाडीचे पुढील डावे चाकाजवळ धडक देवुन मोटारसायकल चालक प्रदिप शंकर गुरव यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभुत झालात म्हणून, तुम्ही त्याव्दारे **भारतीय दंड**

**विधान १८६० चे कलम ३३८ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

पाचवे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही आरोपीने वरील वाहन अशा पद्धतीने चालवले जे प्रकरणातील सर्व परिस्थिती लक्षात घेता जनतेसाठी धोकादायक होते म्हणून तुम्ही, **मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १८४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही आरोपीने त्या वाहनाची प्रभावी वैध विमा पॉलिसी नसताना सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवले, म्हणून तुम्ही, **मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १४६/१९६ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.08.05 11:39:31 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – ०४/०८/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**प्रमाणपत्र**

आरोपीला आरोप पत्रातील मजकूर त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.08.05 11:39:36 +0530

**स्थळ – देवरुख** **(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – ०४/०८/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence/plea.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 04/08/2025 |
| Plea signed by the presiding officer on | : | 04/08/2025 |
| Plea uploaded on | : | 05/08/2025 |